# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## प्रेसनोट

# पीएमपीएमएल कडून ४ बस मार्ग स्वारगेट मेट्रो स्टेशन पर्यंत खंडीत

➢ मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक वारंवारीतेने बसेस उपलब्ध होणार.

पुणे महामेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून स्वारगेट ते पिंपरी पर्यंत मेट्रो सेवा सुरु करण्यात आली असून त्यामुळे प्रवाशांना अधिक वारंवारीतेने बसेस उपलब्ध होणेच्या दृष्टीने पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सध्या संचलनात असलेले मेट्रो शटल क्र. १३, बस मार्ग क्र. ३८, २१६, २९७ हे मार्ग स्वारगेट मेट्रो स्टेशन पर्यंत खंडीत केले आहेत. सदरचा बदल हा शुक्रवार दिनांक ११/१०/२०२४ रोजी पासुन करण्यात येणार आहे.

❖ खंडित बस मार्ग पुढील प्रमाणे...

१. मेट्रोशटल क्र. १३ अप्पर डेपो ते सिव्हिल कोर्ट शिवाजीनगर हा बसमार्ग स्वारगेट मेट्रो स्टेशन पर्यंत खंडीत करून ३० बसफेऱ्यामध्ये वाढ करून सरासरी २० मि. वारंवारीतेने बसेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
२. बसमार्ग क्र. ३८ धनकवडी ते न. ता. वाडी हा बसमार्ग स्वारगेट मेट्रो स्टेशन पर्यंत खंडीत करून ६८ बस फेऱ्यामध्ये वाढ करून सरासरी १० मि. वारंवारीतेने बसेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
३. बसमार्ग क्र. २१६ भारती विद्यापीठ ते शिवाजीनगर हा बसमार्ग स्वारगेट मेट्रो स्टेशन पर्यंत खंडीत करून ३२ बसफेऱ्यामध्ये वाढ करून सरासरी १५ मि. वारंवारीतेने बसेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
४. बसमार्ग क्र. २९७ राजेश सोसायटी ते शिवाजीनगर हा बसमार्ग स्वारगेट मेट्रो स्टेशन पर्यंत खंडीत करून ०६ बसफेऱ्यामध्ये वाढ करून सरासरी ०१ तास ३० मि. वारंवारीतेने बसेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

सदर बससेवेंचा लाभ विद्यार्थी, कामगार, नोकरदार व महिला वर्ग यांनी घ्यावा असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडुन करण्यात येत आहे.

Sd/-
**चीफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १०/१०/२०२४.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.